पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती ( विशेष सभा )**

कार्यपत्रिका क्रमांक - १

**सभावृत्तांत**

दिनांक - **१४/०६/२०१९** वेळ – सकाळी **११.१५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पहिली सभा (विशेष सभा) शुक्रवार दिनांक **१४/०६/२०१९** रोजी सकाळी **११.१५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस **मा.श्रीम.रुबल अग्रवाल, (भा.प्र.से.)** पिठासीन प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.कुटे निर्मला संजय
२. मा.मुंढे उषा अंकुश
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.साधना अंकुश मळेकर

या शिवाय मा.झगडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.लोणकर- सहा.आयुक्त मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा – अति.आयुक्त, महानगरपालिका, पुणे** सन्मा.सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करते. आजच्या विशेष सभेत मा.महिला व बालकल्याण समितीचे **सभापती** पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेची पिठासीन प्राधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणुक केलेली आहे.

मुक्त व निर्भयपणे मा. महिला व बालकल्याण समितीच्या **सभापती** पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**मी नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देते.**

**मा.नगरसचिव -** मा. महिला व बालकल्याण समितीचे **सभापती** पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (३) नुसार नेमणूक करणे.

मा.महिला व बालकल्याण समिती **सभापती** पदाकरीता **मा.कुटे निर्मला संजय** यांचे मुदतीत दाखल झालेले एक नामनिर्देशनपत्र मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे छाननी करणे कामी सुपुर्त करण्यात येत आहे.

**- आता छाननीची कार्यवाही करणेत येईल –**

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा अति.आयुक्त, महानगरपालिका, पुणे** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **सभापती**, महिला व बालकल्याण समिती पदाकरीता एक नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.कुटे निर्मला संजय | मा.मुंढे उषा अंकुश | मा.फुगे भिमाबाई पोपट |

मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती या पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एक नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून सदर नामनिर्देशन पत्र परिपूर्ण आहे. त्यावर उमेदवाराचे नाव, पत्ता, प्रभाग क्रमांक नमुद आहे तसेच नामनिर्देशन पत्रावर उमेदवाराची स्वाक्षरी आहे. त्याचप्रमाणे नामनिर्देशन पत्रावर समितीच्या एका सदस्याने सुचक म्हणून स्वाक्षरी केली आहे आणि दुस-या सदस्याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली आहे. सबब सदरचे नामनिर्देशनपत्र वैध असून स्विकृत करण्यात येत आहे.

त्यामध्ये मा.महिला व बालकल्याण समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.कुटे निर्मला संजय** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

**- नामनिर्देशनपत्र माघारी घेणे –**

उमेदवारास उमेदवारी अर्ज माघारी घेणेकामी सकाळी ११.२० ते ११.२५ वा. पर्यंत वेळ देण्यात आली या वेळेत उमेदवाराने उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही.

**- उमदेवार निवडून आल्याची घोषणा –**

नामनिर्देशनपत्र माघारी घेणेबाबत विचारणा केली असता उमेदवाराने उमेदवारी मागे घेणार नसल्याचे सांगितले. सबब मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.कुटे निर्मला संजय** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

यास्तव **मा.कुटे निर्मला संजय** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे मी रुबल अग्रवाल, पिठासीन प्राधिकारी, तथा अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, पुणे, महिला व बालकल्याण समिती (विशेष सभा) जाहीर करते.

----------

ठराव क्रमांक - १ | विषय क्रमांक - १
दिनांक - १४/०६/२०१९ | विभाग – नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समिती **सभापती** पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्रामधील मा.महिला व बालकल्याण समिती **सभापती** पदाची निवडणूक लढविणा-या **मा.कुटे निर्मला संजय** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.कुटे निर्मला संजय** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

---------

**सही/-**
**(रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
पिठासीन प्राधिकारी तथा
अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा
महिला व बालकल्याण समिती (विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२७८/२०१९
दिनांक : १४/०६/२०१८



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2018-19 sub committee sabhapati.doc